# कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)**
**एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे अपील क्र. ४/२०२३**

**श्री. संजय प्रकाश निंबाळकर**
वय- ६२ वर्षे, व्यवसाय- धंदा
आनंद नगर, उस्मानाबाद. ......................... **अपिलार्थी**

**विरुद्ध**

१. **निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव**
प्रस्तुत विद्यापीठ, औरंगाबाद
२. **श्री. आश्लेष शिवाजीराव मोरे**
भारत शिक्षण संस्था, **उमरगा,**
मेन रोड, उमरगा, ता. उमरगा,
जि. उस्मानाबाद- ४१३६०६ ......................... **गैरअपिलार्थी**

विषयः- **एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे अपील**

## निर्णय

प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतुदींप्रमाणे सुरू आहेत. सदर प्राधिकरणांपैकी उक्त नमूद अधिनियमातील कलम २८ मध्ये नमूद असलेल्या विद्यापीठाच्या अधिसभा या प्राधिकरणाच्या निवडणुकांचे निकाल दि. १३-१२-२०२२ रोजी जाहीर करण्यात आले आहेत. सदर निवडणुकात उक्त नमूद अधिनियमातील कलम २८ (२)(त) प्रमाणे व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून निवडून आलेल्या गैरअपिलार्थी क्र. २ यांच्याबाबत प्रस्तुत अपील अपिलार्थीने दाखल केले आहे. सदर अपील प्राप्त झाल्यानंतर दि. १२-०१-२०२३ रोजी सर्व गैरअपिलार्थींना सुनावणीची नोटीस पाठवून प्रथम सुनावणी दि. ३१-०१-२०२३ व दि. १७-०२-२०२३ रोजी घेण्यात आली.

**सुनावणीदरम्यान अपिलार्थीने मांडलेले मुद्देः-**

अपिलार्थीने सुनावणीदरम्यान त्यांचे प्रस्तुत अपील हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दि. १३-१२-२०२२ रोजी निवडणूक घोषित करून गैरअपिलार्थी क्र. २ यांना विजयी घोषित केल्याच्या नाराजीने दाखल केले असल्याचे नमूद केले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतूद क्र. १५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतमोजणीदरम्यान आवश्यक ती काळजी घेऊन तरतुदींचे पालन केले नाही त्यायोगे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या बाबतीत दिलेला निकाल रद्द करावा अशी विनंती केली आहे.

अपिलार्थींनी पुढे असेही नमूद केले की, सदर निवडणुकीमध्ये श्री. बसवराज मंगरुळे यांना प्रथम पसंतीची ३५ मते मिळाली आहेत व निवडून येण्यासाठी जाहीर करण्यात आलेला कोटा ३३ मतांचा आहे. सदर बाब लक्षात घेता श्री. बसवराज मंगरुळे यांची ३५ मते मोजून त्यातील प्रथम पसंतीची अहस्तांतरीय मते वगळून राहिलेली सर्व हस्तांतरीय मते मोजून ती एकरूप परिनियमातील तरतूद क्र. १५ (७) मधील उपतरतूद (क) नुसार हस्तांतरीय मतांची संख्या जास्त असेल तर ती मते उपरोक्त तरतूद १५ (५) नुसार पुढील उपलब्ध पसंतीक्रमांक ज्या निरंतर उमेदवारांना देण्यात आलेला असेल त्यांना हस्तांतरित करणे गरजेचे होते. परंतु या मतमोजणी प्रक्रियेत श्री. बसवराज मंगरुळे यांची हस्तांतरित मते व अहस्तांतरित मते वेगळी केली नसल्यामुळे मतमोजणी चुकीच्या पद्धतीने झाली आहे व अशा परिस्थितीत एकरूप परिनियमातील तरतूद क्र. १५ (५) व (७) यांचा भंग झाल्याने पुन्हा नव्याने मतमोजणी करून अधिकचे मते मिळणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करावे असे म्हणणे मांडले.

**सुनावणीदरम्यान गैरअपिलार्थींनी मांडलेले मुद्दे:-**

गैरअपिलार्थी क्र. १ निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर दाखल केले असून त्यांनी मतमोजणीच्या वेळी कोणताही कर्तव्यात कसूर केलेला नसून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केल्याचे नमूद केले आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पुढे असेही नमूद केले की, एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मध्ये मतमोजणीच्या वेळी कोणत्याही निवडणूक उमेदवारास अथवा त्याच्या प्रतिनिधीस मतमोजणीच्या कोणत्याही फेरीवर आक्षेप असल्यास तो आक्षेप नोंदविण्याची वेळ व प्रक्रिया दिलेली आहे आणि अपिलार्थींनी प्रत्यक्ष मतमोजणीच्यावेळी स्वतः किंवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत मतमोजणीच्या कोणत्याही फेरीवर कधीही कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. करिता मतमोजणीच्या निकालानंतर आता त्यांना पुनर्मोजणीची किंवा फेरमोजणीची मागणी करता येणार नाही असे नमूद करून प्रस्तुत अपील खारीज करण्याची विनंती केली आहे.

गैरअपिलार्थी क्र. २ यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून विधिज्ञ श्री. एस. डी. माळी सुनावणीकामी हजर होते. गैरअपिलार्थींनी सुनावणीदरम्यान त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर सादर करून अपिलातील मुद्दे तथ्यहीन असल्याचे नमूद केले व पुढे प्रस्तुत अपील खारीज करण्याबाबत विनंती केली.

गैरअपिलार्थींनी पुढे असेही नमूद केले की, एकरूप परिनियममधील तरतूद क्र. १५ (१७) पाहिली असता सदर तरतुदीप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतमोजणीच्या जबाबदाऱ्या पार पाडताना कोणताही कसूर केलेला नसून परिणामी गैरअपिलार्थी क्र. २ यास योग्य प्रकारे विजेता उमेदवार म्हणून घोषित केलेला आहे. करिता, प्रस्तुत अपील तथ्यहीन असल्याने खारीज करण्यात यावे.

## कारणमीमांसा

एकरूप परिनियम दि. १७ मे २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे प्राप्त अधिकारांन्वये मी प्रस्तुत अपील, त्यातील मुद्दे, गैरअपिलार्थींनी सादर केलेले म्हणणे व सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षांनी सादर केलेले युक्तिवाद बारकाईने ऐकले. प्रस्तुत अपिलात अपिलार्थींनी मांडलेले मुद्दे ठळकपणे पाहिले असता यानुषंगाने एकरूप परिनियम दि. १७ मे २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) पुढीलप्रमाणे दिसून येते.

**१७. अपील :—**

(१) अंतिम फेरी झाल्यानंतर फेरमोजणीची मागणी विचारात घेण्यात येणार नाही. जर उमेदवार किंवा उमेदवाराचा प्रतिनिधी इच्छुक असेल तर मतमोजणीच्या विशिष्ट फेरी अखेर आक्षेप घेऊ शकेल मात्र जर नंतरच्या फेरीमधील मतमोजणी सुरू झाली असेल तर ते कोणताही आक्षेप घेऊ शकणार नाहीत.

उक्त नमूद तरतूद पाहिली असता मतमोजणीच्या वेळी, मतमोजणीच्या विशिष्ट फेरीअखेर, कोणत्याही निवडणूक उमेदवारास त्या फेरीतील मतमोजणीबाबत कोणतीही शंका अथवा वाद असल्यास केवळ त्याचवेळी त्यास आक्षेप घेण्याचा अधिकार यात दिसून येतो. परंतु अशाप्रकारे कोणताही आक्षेप निवडणूक उमेदवाराने त्या विशिष्ट फेरीच्या अखेर घेतलेला नसेल व नंतरच्या फेरीची मतमोजणी सुरू झाली असेल तर त्यास अशाप्रकारचा आक्षेप घेता येणार नाही. उक्त नमूद तरतूद पाहता ही बाब अत्यंत स्पष्ट आहे की मतमोजणीची अंतिम फेरी झाल्यानंतर कोणत्याही निवडणूक उमेदवाराची फेरमोजणीची मागणी विचारात घेता येणार नाही.

प्रस्तुत अपिलार्थीने मतमोजणीच्या वेळी कोणत्याही विशिष्ट फेरीअखेर त्या फेरीवर त्यांना कोणतीही शंका अथवा वाद असल्याबाबत आक्षेप नोंदविलेला दिसून येत नाही आणि त्याअर्थीच मतमोजणीच्या सर्व फेरी संपून अंतिम फेरीदेखील पूर्ण होऊन दि. १३-१२-२०२२ रोजी निवडणुकांचा निकाल घोषित होऊन त्यात गैरअपिलार्थी क्र. २ यास विजयी उमेदवार म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता मतमोजणीच्या वेळी प्रत्येक फेरीअखेर अथवा विशिष्ट मतमोजणी फेरीअखेर अपिलार्थीस त्यांना असलेल्या शंका अथवा वादाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदविणे आवश्यक होते. परंतु मतमोजणीदरम्यान त्यांनी असे काहीही अभिलेखावरून दिसून येत नाही किंवा प्रस्तुत अपिलातही त्यांचे तसे म्हणणे नाही त्यामुळे एकंदरित मतमोजणीच्या प्रत्येक फेरीस त्यांनी त्यांची संमती दिल्याने अंतिम फेरी पूर्ण करण्यात आली व त्यानंतर निवडून आलेल्या उमेदवारांची नावे घोषित करण्यात आली. त्याअर्थी उक्त नमूद तरतुदी लक्षात घेता गैरअपिलार्थी क्र १ व २ यांनी मांडलेल्या मुद्यात मला तथ्य दिसून येते त्याअर्थी उक्त नमूद कारणास्तव प्रस्तुत अपील खारीज करणे योग्य राहील, या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे.

## निष्कर्ष

१. वरील नमूद कारणास्तव प्रस्तुत अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. संचिका बंद करण्यात येऊन अभिलेख कक्षास वर्ग करण्यात यावी.

दिनांक :-२० -०२-२०२३
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

कुलगुरू तथा
**निवडणूक अपिलीय अधिकारी**